साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २५.०६.२०२६ | अंक नं. ०७३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन, स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 76665107
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.न
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 77750895

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉइंट
पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगर जिल्ह्यात २९ जून पर्यंत पावसाचा 'येलो अलर्ट'

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात २५ ते २९ जून या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुटण्याची दाट शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे संपूर्ण जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, जिल्ह्यातील नागरिकांनी योग्य ती दक्षता व खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, मेघगर्जनेच्या वेळी किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत झाडांखाली अथवा झाडांच्या जवळ उभे राहू नये. विजांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. विजांच्या पूर्वसूचना व इशारा मिळवण्यासाठी भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाकडील दामिनी ॲप प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करून घ्यावे, असे सूचित करण्यात आले आहे. गडगडाटी वादळादरम्यान घरातील कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये व विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. या काळात शेतातील ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल किंवा सायकल यांसारख्या साधनांपासून दूर राहावे.

मोकळी मैदाने, झाडे, उंच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत अथवा दिव्यांचे खांब, धातूंचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मर यांच्या जवळ थांबणे अत्यंत धोकादायक ठरू शकते; त्यामुळे अशा ठिकाणांपासून दूर राहावे तसेच सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबणाऱ्या केबल्सपासून अंतर राखावे. रस्त्यांवरील मोठे जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी नागरिकांनी होर्डिंग्सच्या आजूबाजूला थांबू नये. विजा चमकत असताना कोणी मोकळ्या जागेवर असल्यास, सुरक्षेसाठी जमिनीवर गुडघ्यांवर बसून हाताने आपले कान झाकावेत व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये झुकवावे, जेणेकरून जमिनीशी शरीराचा कमीत कमी संपर्क येईल.

धरण व नदी क्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी आणि पर्यटकांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. धरणाचे पाणी, नदी किंवा कालव्यांच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये, तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी काढण्याचा मोह टाळावा, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

हा काळ शेतीसाठी महत्त्वाचा असल्याने शेतकरी बांधवांनी वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे होणारे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी वेळेतच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असल्यास किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असल्यास, मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी, तसेच पाळीव जनावरांचेही तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. संकटसमयी नजीकचे पोलीस स्टेशन किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवण्यासाठी जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथील दूरध्वनी क्र. ०२४१-२३२३८४४ / २३५६९४० किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

|| प्रथम पुण्यस्मरण ||
तुमचं असणं सर्व काही होतं, आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं...
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे, पण तुमचं नसणं तीच मोठी उणीव आहे
स्व. साहेबराव रंगनाथ आव्हाड
स्वर्गवास : दि. ०७/०६/२०२५
प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम
शुक्रवार दि. २६/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.
- प्रवचन व्याख्याते -
सकाळी १० वाजता
गणेश महाराज शिंदे यांचे प्रवचन होईल.
• आपले विनित •
श्रीमती. ताराबाई साहेबराव आव्हाड (पत्नी)
श्री. विवेक साहेबराव आव्हाड (मुलगा) — श्री. महेश साहेबराव आव्हाड (मुलगा)
सौ. आरती विवेक आव्हाड (सून) — सौ. सुवर्णा महेश आव्हाड (सून)
सौ. कविता अनिल वारे (मुलगी) — श्री. अनिल तुळशीराम वारे (जावई)
सौ. जयश्री श्रीराम शिरसाट (मुलगी) — श्री. श्रीराम पांडुरंग शिरसाट (जावई)
समस्त आव्हाड परिवार आप्तेष्ट, नातेवाईक
ठिकाण : वाणी नगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
www.dishagroup.in
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

जर सोनं असेल घरात, तर पैसे येतील क्षणांत !
नागेबाबा गोल्ड लोन
₹ 1 लाख आपल्या हातात !
• कमीत कमी व्याजदर • वर्षाचे ३६५ दिवस सुविधा उपलब्ध
• रविवार किंवा सुट्टीच्या दिवशीही सोनेतारण कर्ज
नागेबाबा मल्टिस्टेट
श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि., अ.नगर
955 255 4010
विश्वविक्रम रचणारी अग्रगण्य संस्था!

भाड्याने देणे आहे
शहराच्या मध्यभागात रसरंग मिसळ समोर
शोरुम/दुकान
फर्निचरसह भाड्याने देणे आहे
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
उत्तम पगार+ बेनिफीट
संपर्क सायं. ६ ते ८.३०
9422226825

* वॉल हूक * हार हूक
* अगरबत्ती स्टॅण्ड
* पेपर डिश * पत्रावळी
* ग्लासेस * द्रोण
* पेपर नॅपकिन * टिशु पेपर
* किचनरोल * टॉयलेटरोल
* बबल पेपर * गिफ्ट पेपर
* बटर पेपर * कापडी बॅग
* फॅन्सी गिफ्ट बॅग
* फूड ग्रेड पॅकिंग पेपर पिशव्या मिळतील.
पिशव्या प्रिंटींगसाठी
मधूर प्लॅस्टिक
घासगल्ली, अहिल्यानगर

पाहिजेत
सोनवाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

- पाहिजेत -
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत
कॅशियर
जागा : 4 (पुरुष)
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 20000/- ते 21000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
कॉम्प्युटर ऑपरेटर
जागा : 2 (पुरुष)
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 20000/- ते 21000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मोड कारागिर
जागा : 1 (पुरुष)
तत्सम क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य
पगार : 18000/- ते 19000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह बुधवार ते शनिवार सकाळी 11 ते 5 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/0

सेल । सेल ।। सेल ।।।
स्टॉक क्लिअरन्स सेल
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
महिलांसाठी
कुर्ती+ पॅन्ट, क्वॉर्ड सेट, नाईट ड्रेस, वनपीस, वेस्टर्न वनपीस रु.२५०/- पासून पुढे
* साडी-रु.१०० पासून पुढे
* रेडिमेड ब्लाऊज २ पीस-रु.१००/-
पुरुषांसाठी
बेस्ट क्वॉलिटी शर्ट रु.२२०/-पासून पुढे
नाईट पॅण्ट रु.२०० पासून पुढे
कार्गो पॅण्ट रु.२५०/-
जीन्स रु.३००/-पासून पुढे
तसेच ब्रॅण्डेड शर्ट 7xL पर्यंत. जीन्स व फार्मल पॅण्ट साईज ४४ पर्यंत, टी शर्ट 6xL पर्यंत.
लहान मुला-मुलींचे ड्रेस ड्रेस रु.२५०/-पासून पुढे, लहान मुलींचे प्लाझो फक्त रु.१००/-

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## पोलिसांची जिल्हाभरात विशेष मोहीम; एका रात्रीत २५५ वॉरंटची बजावणी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याबरोबरच प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांच्या निपटाऱ्यास गती देण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने विशेष धडक मोहीम राबवत एका रात्रीत तब्बल २५५ वॉरंटची यशस्वी बजावणी केली. या मोहिमेमुळे फरार व वॉरंटधारक आरोपींमध्ये चांगलाच धाक निर्माण झाला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली २१ जून रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते २२ जून रोजी सकाळी ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये न्यायालयाकडून जारी करण्यात आलेल्या नॉन–बेलेबल (अजामीनपात्र) आणि बेलेबल (जामीनपात्र) वॉरंटची बजावणी करण्यावर भर देण्यात आला. मोहिमेसाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधील पोलीस अधिकारी व अंमलदारांची स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी रात्रीच्या वेळेत विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून वॉरंटमधील आरोपींचा माग काढला. या कारवाईत ११२ नॉन–बेलेबल वॉरंट आणि १४३ बेलेबल वॉरंट अशा एकूण २५५ वॉरंटची बजावणी करण्यात आली.

विशेष म्हणजे, न्यायालयीन प्रक्रियेत अडथळा निर्माण करणारे तसेच वॉरंट असूनही हजर न राहणाऱ्या आरोपींविरोधात ही मोहीम प्रभावी ठरली आहे. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वय साधत मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ वापरून ही कारवाई यशस्वी केली. पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी गुन्हेगारांवर प्रभावी वचक निर्माण करण्यासाठी तसेच कायद्याची अंमलबजावणी अधिक काटेकोर करण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारच्या धडक आणि विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## नगर शहरात २१५ इमारती धोकादायक; ३ इमारती अतिजर्जर, महापालिकेने बजावल्या घरमालक, भोगवटादार यांना नोटिसा

नगर – दरवर्षी पावसाळ्यात नगर शहरात इमारत किंवा इमारतीचा काही भाग कोसळल्याच्या घटना समोर येतात. मागील महिन्यात वादळाने शहरातील एका इमारतीची भिंत कोसळून कारचे नुकसान झाले होते. तथापि, शहरात अजूनही तब्बल २१५ इमारती धोकादायक असून, या इमारती उतरवून घेण्याची गरज आहे. महापालिकेने नोटिसा बजावूनही संबंधित घरमालक अथवा भोगावटदार या इमारती उतरवून घेत नसल्याची माहिती पुढे आली आहे. यातील ३ इमारती अत्यंत जर्जर झालेल्या असून, त्या केंव्हाही पडू शकतात, अशी स्थिती आहे. मात्र, तरीही संबंधित घरमालक आपसी वादामुळे जागा सोडण्यास तयार नसल्याचे सांगण्यात आले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून धोकादायक इमारती निश्चित करुन त्या उतरवून घेण्याची कार्यवाही केली जाते. अहिल्यानगर शहरात महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरातील अशा सर्व जर्जर व धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. एकूण २४३ धोकादायक इमारतींपैकी २८ इमारती आतापर्यंत पाडण्यात (उतरविण्यात) आल्या आहेत, तर १६ इमारतींचे खटले न्यायालयात प्रलंबित (न्यायप्रविष्ट) आहेत. हे कायदेशीर वाद न्यायालयात असल्यामुळे या १६ इमारतींवर महापालिकेला सध्या कोणतीही थेट कारवाई करता येत नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, ज्या धोकादायक इमारती पूर्णपणे मोकळ्या आहेत, म्हणजेच जेथे कोणीही वास्तव्यास नाही, अशा इमारती महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून थेट पुढाकार घेऊन उतरविल्या जात आहेत. मात्र, ज्या इमारतींमध्ये लोक राहत आहेत किंवा ज्यांना नोटिसा देऊनही मालकांनी त्या उतरविलेल्या नाहीत, अशा इमारतींबाबत महापालिकेने कडक इशारा दिला आहे. नोटीस देऊनही जर इमारत उतरविली नाही आणि ती कोसळून एखादी दुर्घटना घडली, कोणाला इजा झाली किंवा वित्तीय नुकसान झाले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित इमारतीचे मालक आणि भोगवटादार यांच्यावरच निश्चित केली जाईल.

शहरात सध्या २ ते ३ इमारती अतिशय जर्जर आणि अत्यंत धोकादायक अवस्थेत आहेत, जिथे अजूनही घरमालक स्वतः राहत आहेत. या इमारती कोणत्याही क्षणी कोसळून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या अतिजर्जर इमारती रिकाम्या करून त्या तातडीने उतरवून घेण्यासाठी महापालिका प्रशासन विशेष प्रयत्न करत असून, लवकरच या इमारती पाडण्यात येतील, असेही सांगण्यात आले. दरम्यान, एखाद्या इमारतीचा मोडकळीस आलेला भाग काढण्यासाठी किंवा संपूर्ण इमारत उतरवण्यासाठी महापालिकेला जो काही खर्च येईल, तो सर्व खर्च संबंधित इमारत मालकाच्या घरपट्टीत (मालमत्ता करात) समाविष्ट करून तो वसूल केला जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे. नागरिकांनी सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## नगर जिल्ह्यात चार ठिकाणी अवैध धंद्यांवर पोलिसांचे छापे

नगर – अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत श्रीरामपूर शहर, श्रीरामपूर तालुका आणि अकोले पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापेमारी केली. या कारवाईत एका अवैध दारू विक्रेत्यासह तीन जुगार अड्ड्यांवर छापे टाकून एकूण १ लाख ५६ हजार ७७० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरोधात चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना दिल्या आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष पथक तयार करून जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती गोळा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार २३ जून रोजी पथकाने श्रीरामपुर शहर, श्रीरामपुर तालुका, अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली.

## केडगावमध्ये रस्त्याच्या वादातून शेतकरी कुटुंबाला बेदम मारहाण

नगर – केडगाव येथील कोतकर मळा परिसरात सामाईक रस्त्याच्या कारणावरून शेती व्यवसाय करणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाच्या कुटुंबावर शेजाऱ्यांनीच प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात चाकू, लाकडी दांडके आणि दगडांचा वापर करण्यात आला असून, पीडित कुटुंबाला गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सहादु किसन कोतकर (वय ६०, रा. कोतकर मळा, केडगाव) यांनी २४ जून रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह कोतकर मळा परिसरात राहत असताना हा प्रकार घडला. सामाईक रस्त्यावरून जात असताना आरोपी माऊली उर्फ ज्ञानेश्वर कोतकर, ऋतुजा ज्ञानेश्वर कोतकर, सुमन उर्फ बबई यादव कोतकर आणि ऋषीकेश यादव कोतकर यांनी त्यांना रस्त्यात अडवले. तुम्ही सर्वजण इथे कसे राहता तेच मी पाहतो, अशी धमकी देत आरोपींनी वाद घालण्यास सुरुवात केली.

हा वाद इतका विकोपाला गेला की आरोपी माऊली याने चाकू सारख्या धारदार शस्त्राने फिर्यादींवर वार केले. तर ऋषीकेश याने लाकडी दांडक्याने फिर्यादी आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केली. इतर आरोपींनी दगडाने मारहाण करत लाथाबुक्क्यांनी गंभीर जखमा केल्या. या संपूर्ण झटापटीत पीडित कुटुंबातील सदस्यांचे दागिनेही गहाळ झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्या जबाबावरून कोतवाली पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विश्वास गाजरे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## मतदार यादी शुद्धीकरणासाठी ३० जूनपासून बीएलओ आपल्या दारी

### अहिल्यानगरमध्ये एसआयआर पडताळणीचे विशेष प्रशिक्षण

नगर – येत्या ३० जूनपासून ते २९ जुलै या कालावधीत मतदार यादीचे अद्ययावतीकरण आणि शुद्धीकरण करण्यासाठी बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) घरोघरी जाऊन विशेष मोहीम राबवणार आहेत. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या सभागृहात बीएलओ कर्मचाऱ्यांसाठी एसआयआर पडताळणीचे सविस्तर प्रशिक्षण २५ जून रोजी देण्यात आले.


एसआयआर पडताळणीबाबत बीएलओंना मार्गदर्शन करताना प्रांताधिकारी सुधीर पाटील. (छाया – लहू दळवी)

या प्रशिक्षण कार्यक्रमाला प्रांताधिकारी सुधीर पाटील, महानगरपालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे, उपायुक्त एस. तडवी यांच्यासह तांत्रिक क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये उपस्थित अधिकाऱ्यांनी एसआयआर पडताळणीचे महत्त्व आणि बीएलओच्या जबाबदाऱ्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. मतदार यादीमधील चुका पूर्णपणे सुधारून ती त्रुटीरहित करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी स्पष्ट केले. तसेच मोहिमेदरम्यान बीएलओ यांनी घरोघरी जाऊन एकाच मतदाराचे नाव दोन ठिकाणी असणे किंवा एकाच नावाचे दोन मतदार असणे यासारख्या दुबार नोंदींची तपासणी करणे, यासोबतच जे मतदार सध्या संबंधित भागात राहत नाहीत अशा स्थलांतरित मतदारांच्या नोंदी तपासणे, मृत मतदारांची नावे यादीतून वगळणे, आणि ज्या मतदारांचे फोटो अस्पष्ट आहेत अथवा नाव, वय, पत्ता यात चुका आहेत, त्या दुरुस्त करण्याबाबतही पाटील यांनी मार्गदर्शन केले.

सध्याची निवडणूक प्रक्रिया डिजिटल होत असल्याने, या मोहिमेत तांत्रिक अचूकतेला सर्वाधिक महत्त्व दिले गेले आहे. प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञांनी बीएलओ ॲपच्या वापराबाबत कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. यामध्ये ॲपवर लॉगिन कसे करावे, मतदारांचा डेटा सुरक्षितपणे कसा अपलोड करावा, आणि प्रत्यक्ष गृहभेटी दरम्यान माहितीची पडताळणी कशी करावी, याचे रीतसर प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांची मतदार म्हणून नोंदणी कशी करावी आणि विविध ई–फॉर्म्सचा वापर कसा करावा, यावरही मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या शेवटी अधिकाऱ्यांनी बीएलओ कर्मचाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. मतदारांच्या नावातील किंवा पत्त्यातील बदल करताना आधार, पॅन कार्ड, वीज बिल यांसारख्या अधिकृत कागदपत्रांची अत्यंत काटेकोरपणे पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संपूर्ण मोहीम ही ३० जून ते २९ जुलै या कालावधीतच पूर्ण करणे बंधनकारक असल्याने, सर्व कर्मचाऱ्यांनी रोजचे उद्दिष्ट ठरवून वेळेत काम पूर्ण करावे, तसेच कोणत्याही तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आपले बीएलओ ॲप नेहमी लेटेस्ट व्हर्जनवर अपडेट ठेवावे, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. या मोहिमेत नागरिकांनीही बीएलओ कर्मचाऱ्यांना सहकार्य करून आपली मतदार नोंदणी अचूक करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## एमआयडीसीमधील कंपनीत गळफास घेऊन आत्महत्या

नगर – पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी परिसरात असलेल्या सीपीजी कंपनीत काम करणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणाने कंपनीच्या आवारातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २४ जून रोजी दुपारी घडली. तुषार राजेंद्र पाटील (वय २७, मूळ रा. पांढरत, ता. भडगाव, जि. जळगाव; सध्या रा. नूर हाईट्स, अंकुर हॉस्पिटलजवळ, सुपा, ता. पारनेर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तुषार हा सुपा एमआयडीसी मधील सीपीजी कंपनीच्या मेंटेनन्स डिपार्टमेंटमध्ये कार्यरत होता. २४ जून रोजी तो नेहमीप्रमाणे कर्तव्यावर असताना, दुपारच्या सुमारास त्याने मेंटेनन्स डिपार्टमेंट जवळील एक्झिट दरवाजापाशी असलेल्या जिनाच्या जॉईंटला स्टेपिंग पट्टीने गळफास घेतल्याचे आढळून आले. तेथे कार्यरत इतर सहकारी कर्मचाऱ्यांनी ही बाब तात्काळ कंपनी व्यवस्थापनास आणि सुपा पोलिसांना कळविली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात पाठविला. याबाबत सुपा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत तुषार पाटील याच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. सुपा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संपत खैरे पुढील तपास करत आहेत.


ट्रॅक्टर भाड्याने घेवून परस्पर विल्हेवाट लावणारा आरोपी जेरबंद केल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

## ट्रॅक्टर भाड्याने घेवून परस्पर विल्हेवाट लावणारा आरोपी जेरबंद

### अपहार केलेले दोन ट्रॅक्टर केले हस्तगत; एमआयडीसी पोलिसांची कारवाई

नगर – फेसबुकवरील खरेदी–विक्री पेजवर भाड्याने ट्रॅक्टर पाहिजे अशी पोस्ट टाकून दरमहा भाडे देण्याचे आमिष दाखवत ट्रॅक्टर मालकांचा विश्वास संपादन करून त्या ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावणाऱ्याला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ९ लाख रूपये किमतीचे दोन ट्रॅक्टर हस्तगत करण्यात आले आहेत.मल्हारी गहिनीनाथ जायभाये (वय ३२, रा. थाटे, ता. शेवगाव) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत बापुसाहेब नानासाहेब शिंदे (रा. खांबे, ता. संगमनेर, सध्या रा. चेतना कॉलनी, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्यादीनुसार, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मल्हार जायभाये याने विजेच्या तारा ओढण्यासाठी ट्रॅक्टर भाड्याने घेण्याची मागणी केली. दरमहा भाडे देण्याचे आश्वासन देत त्याने शिंदे यांचा ट्रॅक्टर ताब्यात घेतला. मात्र त्यानंतर भाडे न देता ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावत विश्वासघात केल्याचे समोर आले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी तपास पथकाला संशयित आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. पथकाने शोधमोहीम राबवून मल्हार जायभाये याला अटक केली. त्याच्याकडून फिर्यादीचा ट्रॅक्टर हस्तगत केला. तपासादरम्यान संशयित आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्याने आणखी एक फसवणूक केल्याचे उघड झाले. फेसबुकवरील पोस्टच्या माध्यमातूनच प्रदीप काशिनाथ जगताप (रा. भरगाव, ता. वैजापूर) यांच्याशी संपर्क साधून त्यांचाही विश्वास संपादन करत ट्रॅक्टर लंपास केला होता. तो ट्रॅक्टरही पोलिसांनी जप्त केला. सदरची स.पो.नि. हेमंत थोरात यांचे मार्गदर्शनाखाली स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. शैलेश रोहोकले, पो.हे.कॉ. राजू सुद्रीक, पो.कॉ. दिपक फुंदे, पो.कॉ. नवनाथ दहिफळे, पो.कॉ. किशोर जाधव, पो.कॉ. राहुल गुंडु, पो.कॉ. अरुण सांगळे यांचे पथकाने केली आहे.

## मोहरमच्या पार्श्वभूमीवर शहरातील ४३२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

### ड्रोन तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा राहणार वॉच, पोलिसांचा मोठा बंदोबस्तही तैनात

नगर – मोहरम निमित्त २५ जून रोजी रात्री काढण्यात येणारी कत्तलची रात्र मिरवणूक व २६ जून रोजी काढण्यात येणारी विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस प्रशासनाने शहर उपविभागातील तब्बल ४३२ संशयित व उपद्रवी लोकांवर प्रतिबंधात्मक तसेच काहींवर तडीपारीची कारवाई केली आहे.

शहरात कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून शहरात अत्यंत कडक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्यासाठी एकूण ४७४ जणांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र (बाँड) लिहून घेण्यात आले आहे. यामध्ये दारूविक्री करणाऱ्या व बेकायदेशीर कृत्यांमध्ये सामील असलेल्या १३ जणांचा समावेश आहे.

तसेच, शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ६ अट्टल गुन्हेगारांना ६ महिन्यांकरिता थेट जिल्ह्यातून तडीपार (हद्दपार) करण्यात आले आहे. याशिवाय, मोहरम मिरवणूक कालावधीत शांततेला बाधा पोहोचवू शकणाऱ्या ४३२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. समाजात धार्मिक सलोखा कायम राहावा यासाठी पोलीस प्रशासनाने ५३ शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, जातीय सलोखा आणि धर्मगुरूंच्या बैठका घेऊन नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे.

ही प्रतिबंधात्मक कारवाई कारवाई शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टीपरसे, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या स.पो.नि.तेजश्री थोरात यांच्यासह कोतवाली, तोफखाना आणि कॅम्प पोलीस स्टेशनच्या सर्व अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

### शहरात पोलिसांचा असा असेल बंदोबस्त

मिरवणुकीवर ड्रोन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच राहणार आहे. शहरातील प्रत्येक कोपऱ्यावर आधुनिक कॅमेऱ्यांची करडी नजर असणार आहे. मिरवणुकीसाठी पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, २ अप्पर पोलीस अधीक्षक, ५ पोलीस उपअधिक्षक, २१ पोलीस निरीक्षक आणि तब्बल ८५० पोलीस अंमलदार तैनात करण्यात येणार आहेत. शहरातील संवेदनशिल आणि अतिसंवेदनशिल भागांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून संपूर्ण शहरात 'कत्तल की रात' आणि विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर, तसेच मिश्र लोकवस्तीच्या ठिकाणी प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

सोशल मीडिया किंवा प्रत्यक्ष मैदानावर कोणीही अफवा पसरवण्याचा, जातीय सलोखा बिघडवण्याचा किंवा शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्यास, त्याच्याविरुद्ध अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## रंजनाबाई शेंडगे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बागरोजा हडको येथील रहिवासी श्रीमती रंजनाबाई छगनराव शेंडगे (वय ८०) यांचे २५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ४ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. माजी महापौर सौ. रोहिणी शेंडगे यांच्या सासू तर नगरसेवक संजय व संदीप, सुनील, विनोद शेंडगे यांच्या त्या मातोश्री होत.

## अनुष्का गुगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – कुष्ठधाम रोड, सावेडी येथील रहिवासी अनुष्का गुगळे (वय १९) यांचे २५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, वडील, आजोबा, आजी, असा परिवार आहे. डॉ. अतुल गुगळे, डॉ. करुणा गुगळे यांची ती मुलगी तर डॉ. विजयकुमार गुगळे यांची ती नात होत.

## केशव भारताल यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सिव्हील हडको, गणेश चौक येथील रहिवासी केशव नारायण भारताल (वय ८०) यांचे २४ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २५ जून रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष व नितीन भारताल यांचे ते वडील होत.

## पुणे–साईनगर रेल्वेच्या वेळेत बदल करा

### माजी रेल्वे सल्लागार श्रीचंद सचदेव यांची मागणी

नगर – पुणे ते साईनगर शिर्डी दरम्यान धावणाऱ्या रेल्वे गाडीच्या सध्याच्या वेळा प्रवाशांसाठी गैरसोयीच्या ठरत असून, या गाडीच्या वेळेत बदल करण्याची मागणी पुढे आली आहे. ही गाडी सकाळी साईनगर येथून पुण्यासाठी सोडल्यास प्रवाशांना अधिक सोयीचे होईल, अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे सल्लागार श्रीचंद सचदेव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. या संदर्भात त्यांनी पुणे विभागाचे रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) यांना वेळापत्रकात बदल करण्याची मागणी केली आहे.

सध्याच्या वेळापत्रकानुसार, पुणे–साईनगर ही गाडी सकाळी ६.५५ वाजता पुणे येथून निघते. त्यानंतर दौंड कॉर्डलाईन, श्रीगोंदा, अहिल्यानगर, राहुरी, बेलापूर आणि कोपरगाव या स्थानकांवरून प्रवास करत दुपारी १२ वाजता साईनगर येथे पोहोचते. तर परतीच्या प्रवासात ही गाडी साईनगरहून संध्याकाळी ६.१० वाजता निघून रात्री ११.५५ वाजता पुणे येथे पोहोचते. या सद्यस्थितीतील वेळापत्रकावर श्रीचंद सचदेव यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सध्याच्या वेळेनुसार पुणे येथून सकाळी निघणाऱ्या या गाडीत प्रवाशांचे थांबे असलेल्या स्थानकांवरून, विशेषतः अहिल्यानगरहून किती प्रवासी प्रवास करतील, याबाबत साशंकता आहे. तसेच, परतीच्या प्रवासात संध्याकाळी ६.१० वाजता साईनगरहून निघून रात्री उशिरा ११.५५ वाजता पुणे येथे पोहोचणाऱ्या या गाडीत नेमके किती टक्के प्रवासी असतील, हा देखील एक मोठा प्रश्नच असल्याचे सचदेव यांनी नमूद केले.

### असे असावे नवीन वेळापत्रक : प्रस्ताव

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि या रेल्वे गाडीला उत्तम प्रतिसाद मिळण्यासाठी या गाडीच्या फेऱ्या उलट्या क्रमाने चालवणे गरजेचे असल्याचे सचदेव यांनी सांगितले. त्यांच्या प्रस्तावानुसार, ही गाडी सकाळी ५ वाजता पुणे ऐवजी थेट साईनगर येथून सुटली पाहिजे. साईनगरहून सकाळी ५ वाजता निघून कोपरगाव, बेलापूर, राहुरी, अहिल्यानगर, श्रीगोंदा आणि दौंड कॉर्डलाईनमार्गे सकाळी ११ वाजेपर्यंत पुणे येथे पोहोचली, तरच ती नोकरदार, व्यावसायिक आणि सर्वसामान्य प्रवाशांसाठी खऱ्या अर्थाने सोयीस्कर ठरेल. त्यामुळे पुणे डीआरएम यांनी या जनभावनेची दखल घेऊन वेळापत्रकात तातडीने बदल करावा, अशी मागणी श्रीचंद सचदेव यांनी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अंधश्रद्धेचा त्याग करून विज्ञानाची कास धरा

## विजय हुसळे यांचे प्रतिपादन; माता रमाई स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेचे अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर उत्साहात

नगर – जोपर्यंत भारतातील बहुजन समाज अंधश्रद्धेतून बाहेर पडून विज्ञानाची कास धरत नाही, तोपर्यंत तळागाळातील बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक तथा जिल्हा कोषाध्यक्ष आयुष्यमान विजय हुसळे यांनी केले.

माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने सिद्धार्थ बुद्ध विहार, सदर बाजार, भिंगार येथे अंधश्रद्धा निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.


माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने सिद्धार्थ बुद्ध विहार, सदर बाजार, भिंगार येथे अंधश्रद्धा निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान बुद्धांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करण्यात आले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनी मेणबत्ती व अगरबत्ती प्रज्वलित करून सामुदायिक त्रिसरण व पंचशील ग्रहण करून घेतले.

यावेळी केंद्रीय शिक्षक विजय हुसळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, प्रचार पर्यटन सचिव रवींद्र कांबळे, संरक्षण सचिव गोरख केदारे, केंद्रीय शिक्षक प्रकाश कांबळे, समता सैनिक दलाचे मेजर बाळू कांबळे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला.

भिंगार परिसरातील उपस्थित महिलांचे स्वागत भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, प्रचार पर्यटन उपाध्यक्ष मोहन शिरसाट, हिशोब तपासणीस राजेंद्र पाडळे, कार्यालयीन सचिव विजय पाटोळे, संरक्षण सचिव बापू भिंगारदिवे, संरक्षण उपाध्यक्ष मिलिंद घाटेशाही, सचिव विजय कांबळे, संघटक संजय डहाणे, संतोष जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले. केंद्रीय शिक्षक प्रकाश कांबळे, संरक्षण सचिव गोरख केदारे आणि मेजर बाळू कांबळे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

मार्गदर्शन करताना आयुष्यमान विजय हुसळे यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा, राशीभविष्य, महिलांची फसवणूक, भगवान बुद्धांनी सांगितलेला पंचशीलाचा मार्ग आदी विषयांवर उदाहरणांसह सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले, श्रद्धा असावी; मात्र ती डोळस श्रद्धा असावी. भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर समाजाची श्रद्धा असली पाहिजे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी विविध प्रयोग व प्रात्यक्षिकांद्वारे अंधश्रद्धेमागील वास्तव उलगडून दाखवले. तसेच विनायक सापा यांनीही अंधश्रद्धाविषयक प्रयोग सादर केले. कारभारी गवळी (अंधश्रद्धा निर्मूलन सचिव, जात पंचायत विभाग) यांनीही उपस्थितांचे प्रबोधन केले.

या शिबिरास प्रदीप कर्डक, शकुंतला पानपाटील, ओरे ताई, मथुराबाई एकनाथ कांबळे, शिला भिंगारदिवे, विमल घाटेशाही, शोभा आंग्रे, मंजुळा सूर्यवंशी, सरस्वती विघावे, सुमन बनसोडे, लक्ष्मण ओहोळ, वसंतराव घोडके, पोपट आरू, प्रवीण ओरे, सुरेश पानपाटील, प्रज्वल आठवले, शंकर पंडागळे, राहुल पंडागळे, अस्मिता आठवले, सुमेधा आठवले, कांताबाई आठवले, सुमन पानपाटील, निशा गोरखे, शोभा गोरखे यांच्यासह महिला, पुरुष, बालक व बालिका उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सरनंतय गाथा घेऊन शिबिराची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## असून डोळे, जन आंधळे

नसतील आम्हाला डोळे, म्हणून का म्हणता आम्हाला आंधळे ? त्यांचा प्रश्न ऐकून लोक गोंधळले । लगेच ते डोळे नसलेले उसळून म्हणाले, चुप का बसलात सगळे? तुम्हाला कान नाहीत? की असूनही बहिरे ? की बोलायला तोंड नाही? की असूनही आहात मुके ?

ज्याला डोळे नाहीत, तो नाही आंधळा. चांगले-वाईट यात भेद करण्याची दृष्टीच नाही ज्या वेड्याला, जो नेहमी वाईट कामातच गुंतलेला, त्याला म्हणतात आंधळा. तसे बहिरा कोण ? आपल्या हिताचे कुणी सांगितले. ते ऐकूनही समजले नाही, हे बहिरेपणच म्हणायचे, तसेच ज्याचे बोलणे गरज नसताना कडवट असते, मग काम नासणे, नाचक्की होणे. गोड बोलला असता तर ते साधले असते, पण ते न बोलून सगळे गमावणे हे मुकेपणाच.

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




सरळ मार्ग सोडला. नको तो पकडला. लोकांनी तो वाईट आहे म्हणून बजावला, तरी या कुकर्मातच अडकला. मग प्रपंच हा मोठे संकट ठरला. हा डोळे असून जणू आंधळा. तसा सगळी सुभाषिते पाठ करतो, पण वागताना त्यांच्या अर्थाकडे पाठ फिरवितो ।

कथा ऐकतो. ज्ञान घेतो. पुराणे तर स्वतः वाचतो. दुसऱ्याला ऐकवतो. असे करा म्हणजे कार्यभाग साधतो. हे सगळे दुसऱ्याला उपयोगी पडते. पण स्वतःला बाधते. कारण आपल्याला देखील हे लागू पडते हे उमजते. स्वतःला भूल पडते. आपले वागणे नेमके विपरीत घडते. मग कान असून निरुपयोगी ! हाच खरा बहिरा!

एक होता देवदत्त. त्यांचा शेजारी ब्रम्हदत्त. दोघांचे पटेना. एकदा देवदत्ताला आला शेजारचा राग. दिले पेटवून त्याचे घर त्याने काडी लावून. ब्रम्हदत्ताने देवदत्ताला काडी लावताना पाहिले. देवत्तालाही ब्रम्हदत्त पाहतोय, हे दिसले. मग देवदत्त पळत सुटला. ब्रम्हदत्त निघाला त्याला पकडायला पाठोपाठ. घराला लागलेली आग आधी विझवावी, ते सोडले. देवदत्ताला पकडायचेच ठरविले. देवदत्त पुढे व ब्रम्हदत्त मागे, रस्त्यात काही मित्र भेटले. ते म्हणाले? अहो धावता कुठें ? घराला आग लागलीय ना ? दोघेही म्हणाले, तुम्हाला काय करायचंय? तुम्हाला काळजी वाटते तर उचला बादल्या अन घाला पाणी ।

अविचाराने दोघेही पळत होते. कितीतरी वेळा ! शेवटी ब्रम्हदत्त थकला. परतला. देवदत्तही मग मागे वळला. पण तोवर ब्रम्हदत्ताचे घर जळून खाक झाले. देवदत्ताच्या घरालाही आगीच्या ज्वाळांनी घेरले. त्याचेही घर आगीत भस्म झाले. दोघेही क्रोधाने आंधळे. ज्ञान असूनही निरुपयोगी म्हणून बहिरे आणि लोकांशी गोड व बोलण्याने मुके. गमावून बसले सगळे.

– किशोर गांधी

## सहकारी व्यवस्थापन पदविका प्रवेश सुरु

नगर – महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे यांच्या सहकारी शिक्षण – प्रशिक्षण धोरणा अंतर्गत सहकारी व्यवस्थापन पदविका (DCM) दुरस्थ शिक्षण वर्गाच्या प्रवेशासाठी सहकारी संस्थेतील अधिकारी, कर्मचारी पदविधारक व सुशिक्षीत बेरोजगार युवकांसाठी आर. पी. बचाटे, प्र. प्राचार्य मोबा नं. ९५१८३४१२११ स.म.गोपाळराव सोले पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, अहिल्यानगर यांच्याकडे प्रवेशासाठी संपर्क साधण्यात यावा.

सहकारी संस्थेतील सेवकांसाठी उपयुक्त व गुणवत्ता पुर्ण व्यवस्थापन करण्यासाठी आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७४ च्या तरतुदीचे पालन होण्यासाठी सदर पदविका आवश्यक असल्याने संस्थांनी आपले अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षीत करुन घेणे आवश्यक आहे. सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी सहकार क्षेत्रात रोजगार नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते. सहकारी व्यवस्थापन पदविका कालावधी १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२६ असा राहिल सदर सहकारी व्यवस्थापन पदविका संस्था उमेदवारा करिता सहकारी संस्थेत सहा महिन्याचा अनुभव व १० वी पास असावा. तर खाजगी उमेदवारासाठी कोणत्याही शाखेतील पदविधर अथवा समतुल्य पदवि किंवा १२ वी पास असावा. सहकार व्यवस्थापन पदविका ही दुरस्थ शिक्षण पदविका असल्याने प्रत्यक्ष उपस्थित रहावे लागणार नाही.

# एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर – प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. स्वप्निलदादा शिंदे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये तीन दिवसांत नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली.

२२ ते २४ जून या कालावधीत जनसंपर्क कार्यालय, पाटील हॉस्पिटल शेजारी, कोठी, अहिल्यानगर येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू असलेल्या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत डिजिटल प्रवास व्यवस्थेचे स्वागत केले.


प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

एसटी महामंडळाच्या स्मार्ट कार्डमुळे नागरिकांना एसटी बस, मेट्रो तसेच इतर सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी एकाच कार्डचा वापर करता येणार आहे. त्यामुळे तिकीटासाठी रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार असून रोख पैशांच्या व्यवहारांनाही पर्याय उपलब्ध होणार आहे. याशिवाय हे कार्ड आधार कार्ड, मोबाईल क्रमांक किंवा UDID कार्डशी लिंक करता येत असल्याने सर्व व्यवहारांची सुरक्षित व पारदर्शक नोंद ठेवणे शक्य होणार आहे.

शासनाच्या डिजिटल उपक्रमांना बळकटी देणाऱ्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी प्रतिसाद दिला. शिबिरादरम्यान नोंदणीसाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करून त्यांची नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली.

डिजिटल अहिल्यानगरच्या दिशेने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असून नागरिकांनी अशा उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वप्निल शिंदे यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल नागरिकांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

## कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांना पिपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्यावतीने मानवंदना

नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नोंदणी, कायदेशीर अस्तित्व, आर्थिक व्यवहार, निधीचे स्रोत, खर्चाचे तपशील आणि लेखापरीक्षण अहवाल सार्वजनिकपणे जाहीर करण्याची मागणी करणारे कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांच्या भूमिकेचे स्वागत करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने त्यांना न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे राष्ट्रीय मानवंदना अर्पण करण्याचा ठराव करण्यात आला आहे.

यासंदर्भात माहिती देताना अॅड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी सांगितले, २६ जून रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक येथे हा मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याचे राज्य यांना बळकटी देण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

अॅड. कारभारी गवळी म्हणाले, देशातील सामान्य नागरिक, लहान-मोठ्या सर्व संस्था, विविध सार्वजनिक मंडळांना शासनाकडे नोंदणी, करभरणा, लेखापरीक्षण आणि आर्थिक हिशेब सादर करण्याची कायदेशीर जबाबदारी पार पाडावी लागते. त्यामुळे देशव्यापी प्रभाव असलेल्या कोणत्याही संस्थेला पारदर्शकतेपासून सूट मिळता कामा नये. नोंदणी म्हणजे संस्थेची कायदेशीर ओळख, लेखापरीक्षण म्हणजे आर्थिक प्रामाणिकपणाची खात्री आणि सार्वजनिक उत्तरदायित्व म्हणजे लोकशाहीची शिस्त. राष्ट्रसेवेचा दावा करणाऱ्या कोणत्याही संस्थेने राष्ट्रासमोर आपले हिशेब मांडण्यास तयार असले पाहिजे, असे मत अॅड. गवळी यांनी व्यक्त केले.

पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने स्पष्ट केले की, प्रियांक खर्गे यांनी उपस्थित केलेले प्रश्न कोणत्याही धर्माविरोधात, विचारधारेविरोधात किंवा सामान्य स्वयंसेवकांविरोधात नसून ते संविधान, कायदा आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहेत. धार्मिक श्रद्धा हा वैयक्तिक विषय असू शकतो; मात्र संघटित संस्था, त्यांचे निधी, शाखा, उपक्रम आणि सार्वजनिक जीवनावरील प्रभाव या बाबी सार्वजनिक तपासणी आणि उत्तरदायित्वाच्या कक्षेत येतात. याच पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांच्या नावाने राष्ट्रीय मानवंदना देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. जर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे आवश्यक नोंदणी, लेखापरीक्षण अहवाल, कर अनुपालनासंबंधी कागदपत्रे आणि इतर कायदेशीर दस्तऐवज उपलब्ध असतील, तर ते सार्वजनिकपणे सादर करण्यात कोणतीही अडचण नसावी. तसेच विद्यमान कायद्यांमध्ये अशा मोठ्या आणि प्रभावशाली संस्थांसाठी पारदर्शकतेची सक्ती नसल्यास केंद्र आणि राज्य सरकारांनी स्वतंत्र पारदर्शकता कायदा करण्याचा विचार करावा, अशी मागणीही करण्यात आली. या उपक्रमाच्या आयोजनासाठी अॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, अॅड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, अॅड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

## संगीत परीक्षेत शौर्य देशमुख केंद्रात प्रथम

नगर – अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल– मे २०२६ सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा (तबला) मध्ये शौर्य देशमुख यांनी प्रवेशिका पूर्ण (तबला) परीक्षेत विशेष योग्यतेसह केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



चि.शौर्य यांना या यशासाठी आरोही संगीत विद्यालयाचे संचालक स्वप्निल खराडे व शितल खराडे यांच्यासह वडील वैभव देशमुख व आई सौ. कल्पना देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# ‘शिकला तोच घडला’; शिक्षणासाठी वयाचे बंधन नाही

## डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; शिक्षण पूर्ण करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर – भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील मैत्रीपूर्ण नातेसंबंधातून शिक्षण दिले जाते. या शाळेची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा म्हणजे येथे एकाच वर्गात नवरा-बायको, सुन-सासू, आई-मुलगी तसेच वडील-मुलगा यांनी एकत्र शिक्षण घेऊन यशस्वीरीत्या उत्तीर्ण होण्याची अनेक उदाहरणे आहेत. शिक्षणासाठी कोणतेही वयोमर्यादेचे बंधन नसून शिक्षण घेण्याची इच्छा, जिद्द आणि आयुष्यात पुढे जाण्याची तयारी असणे आवश्यक आहे. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पारस कोठारी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, रात्रशाळेत केवळ पुस्तकांपुरते शिक्षण दिले जात नाही, तर विद्यार्थ्याला जीवनात सक्षमपणे उभे राहण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन आणि कौशल्य विकासावरही विशेष भर दिला जातो. मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. दिवसभर उपजीविकेसाठी काम करून रात्री शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या कष्टाने शिक्षण पूर्ण करतात. त्यामुळे 'शिकला तोच जीवनात घडला' या उक्तीचा प्रत्यय येथे दररोज येतो. या रात्रशाळेतून शिक्षण पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांतील उच्च पदांवर कार्यरत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करावे आणि अधिकाधिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी रात्रशाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.


भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहातील शिक्षणाशी जोडण्याच्या उद्देशाने शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उज्वल भविष्य घडविण्याचा संदेश देण्यात आला.

शाळेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'शिक्षण दूत' मोहिमेअंतर्गत शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, नोकरी करणारे युवक-युवती तसेच विविध व्यवसायांमध्ये कार्यरत असलेले नागरिक यांनी रात्रशाळेतील विविध वर्गांमध्ये प्रवेश घेतला आहे. शिक्षणाची ओढ आणि स्वतःचे आयुष्य अधिक सक्षम करण्याची जिद्द बाळगणाऱ्या या विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्या दिवशी विशेष स्वागत करण्यात आले.

भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ पार पडला. यावेळी प्राचार्य सुनिल सुसरे, महादेव राऊत, अमोल कदम, उज्वला साठे, वृषाली साताळकर, अनुराधा दरेकर, वैशाली दुराफे, बाळासाहेब गोरडे, संदेश पिपाडा, गजेंद्र गाडगीळ, शिवा शिंदे, कैलास करांडे, गजेंद्र गाडगीळ, मंगेश भुते, अशोक शिंदे, प्रशांत शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य सुनिल सुसरे यांनी शाळेत उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन पद्धती तसेच मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची सविस्तर माहिती दिली. दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश भुते यांनी केले. गजेंद्र गाडगीळ यांनी आभार मानले. नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, अनंत फडणीस, डॉ. रमेश झरकर आदींनी शुभेच्छा दिल्या.

### शहरातील एका ६० वर्षीय सराफ व्यावसायिकाचा शिक्षणासाठी प्रवेश

१९८२ मध्ये दहावी केलेल्या सराफ व्यावसायिक प्रमोद बुऱ्हाडे यांनी आपले अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला आहे. कौटुंबिक जबाबदारी व व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेता आले नसल्याने त्यांनी तब्बल ४४ वर्षांनी पुन्हा इयत्ता ११ वीसाठी प्रवेश घेतला असून, आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार घेऊन ते शाळेच्या पहिल्या दिवशी देखील हजर होते. यावेळी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# तिला समजून घ्या हो

तिच्याकडूनच शिकावं संघर्षाच्या वाटा
आनंदाने पार करत कस जगावं जगणं ....
जेव्हा तिला आईपण आलं तेव्हापासून
ती विसरुन जाते तिचं स्वतःचं जगण ....

प्रत्येक घराची शोभा वाढवणारी घराला घरपण देनारी लहान मुलांना उत्तम संस्कार देणारी नातीगोती जपणारी सर्वांची काळजी घेणारी ही प्रत्येक घरातील स्त्री असते. आईबाबांच्या घरी सर्वांची ही लाडकी परी असते परंतू कमी समज असताना कमी वय असताना समाजाबद्दल अनोळखी माणसांबद्दल तिला काहीच माहीत नसताना ती लग्न झाल्यानंतर संसाराची धुरा ही आपल्या खांद्यावर सहजपने घेत ती जबाबदाऱ्या छानपने सांभाळते. घरातील प्रत्येक गोष्ट ने-आण करण्यापासून ते घरातील प्रत्येक कामे तिला एकटीलाच करावे लागतात. ज्या भाग्यवान आहेत त्यांना सगळ आयतं मिळत पन बहुतांश महिलांना प्रचंड जबाबदाऱ्या सांभाळाव्याच लागतात. मुलांचे आजारपण त्यांचे संगोपन थोडी मोठी झाली कि त्यांचा प्ले ग्रुप नर्सरी छोटा गट मोठा गट बालवाडी बापरे हे सारं तिलाचं पहावं लागते. यामधे बाबांची पन भूमिका असते बर का. काही अपवाद वगळता. त्यानंतर शाळा सुरु होते मग खाजगी शिकवणीला सोडवायला आणायला जावे लागते. तिचे स्वतःचे महिन्यातील ते चार दिवस. तिच्या इतर शारीरिक तक्रारी यामधे पुरती दमून जाते हो ती. पन सांगणार कुणाला ? या सर्व जबाबदाऱ्या ती हसत आनंदात अलगद पार करते असते. ज्या नवऱ्यासोबत सप्तपदी चालून ती या घरात आलेली असते अल्पावधीतच मूले झाल्यानंतर ती त्या बिचाऱ्याला वेळही देऊ शकत नाही.

मुले झाली की आई आणि बाबा दोघेही स्वतःसाठीचे जगणे विसरून जातात. खरं म्हणजे जबाबदाऱ्याच्या ओझ्याखाली दोघेही पुरते दबून जातात. दोघे एकमेकांसाठी कमी पण मुलांसाठीच आयुष्यभर जगत असतात. ती तिच माहेरी जाणे देखील विसरुन जाते. पुरुष तरी मित्र मंडळी मधे रमतात पार्टीला जातात फिरायला जातात हल्ली महिला पन या गोष्टी करतात. पन घराबाहेर पडताना घरामधील सगळे कामे आवरूनच त्यांना बाहेर पडावे लागते. बाहेर पडतानाचा जो आनंद असतो तो जाण्याआधी घरातील सगळी कामे करतानाच विरून जातो. थकून जाते बिचारी. सगळ्या जबाबदाऱ्या पार करताना महिलांची कधी चाळीशी ओलांडते ते तिलादेखील कळत नसते. आयुष्यभर सर्वांच करता करता तिच तिच्या स्वतः कडे आरोग्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले असते. आणि जेव्हा मुले मोठी होतात नोकरीला लागतात त्यांची लग्न होतात तेव्हा या बिचारीच्या आरोग्याच्या अनेक तक्रारी सुरु होतात. मेनोपॉजच्या काळात अनेक स्त्रियांना वेगवेगळ्या त्रासाला सामोरे जावे लागते. मानसिक आरोग्य थोडेफार बिघडते. शरीरातील हार्मोन्स बदलामुळे तिची चिडचीड होते अशा वेळी घरातील प्रत्येकाने तिला समजून घ्यायला हवे. काहींना तिची चिडचीडखटकणारी असते पन ती मुद्दाम करत नसते हेही तितकेच खरे आहे. शरीरातील कॅल्शियमची कमतरता लोहाची कमतरता यामुळे अनेक शारीरिक त्रासांचा सामना बिचाऱ्या महिलांना करावा लागतो. तिच्या वाढत्या वयासोबत तिला समजून घ्या. आयुष्यभर तिने घरच्यांचे सर्वांचे मूड सांभाळलेले असतात. तिचे मूड तुम्ही थोडे सांभाळा तिची होणारी चिडचिड समजून घ्या. वाढत्या वयामधे तिला घरातील कुणाकडून कसलीच अपेक्षा नसते अपेक्षा असते ती फक्त तिला समजून घेण्याची. आयुष्यभर ती सगळ्यांना फाडफाड बोलणारी आयुष्याच्या एका विशीष्ट वळणावर आल्यानंतर खूप शांत होऊन जाते. ती तिच्यामधेच गुरफटून जाते. घरातील स्त्रीला अशावेळी घरातील लोकांचा शब्दांचा आधार हवा असतो. पन कित्येकदा तिला तो वाढत्या वयामधे सुद्धा मिळत नाही हेच खरे आहे...

शब्दांकन :
**सौ. आशा सुधीर साठे,** सैनिकपत्नी,
अहिल्यानगर. मो. ९६०४०५६९२८

# पल्स पोलिओ जनजागृतीसाठी शहरातून निघाली रॅली

## ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचा डोस देण्याचे आवाहन; मनपा जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र व जायंट्स ग्रुपचा उपक्रम

नगर – महानगरपालिका, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र व जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पल्स पोलिओ जनजागृती अभियानांतर्गत भव्य रॅली काढण्यात आली. २८ जून रोजी अहिल्यानगर सर्वत्र लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रॅलीद्वारे बालकांना पोलिओचा डोस पाजून समाज पोलिओमुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले.



महानगरपालिका, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र व जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पल्स पोलिओ जनजागृती अभियानांतर्गत भव्य रॅली काढण्यात आली.

या रॅलीचा शुभारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, स्टेशन रोड येथून करण्यात आला. रॅलीचे उद्घाटन आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व मातांच्या उपस्थितीत फुगे सोडून झाले. रॅली मधील विद्यार्थ्यांनी चौका–चौकात पोलिओच्या जागृतीसाठी पथनाट्य सादर केली. याप्रसंगी जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, जनआरोग्य समितीच्या सदस्या विद्या तन्वर, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, अनिल गांधी, अमित मुनोत, पूजा पातुरकर, रिया पवार नुतन गुगळे, मुख्याध्यापक विजय दिघे, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख व डॉ. नितीन जगताप उपस्थित होते.

वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख व डॉ. नितीन जगताप यांनी पोलिओमुक्त समाज घडविण्याबात उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिवनेरी चौक व गवळीवाडा परिसरातून निघालेल्या या रॅलीत विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी दो बूंद पोलिओ के, पोलिओला नाही म्हणा असे फलक हात घेऊन जनजागृती केली.

या जनजागृती रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना जायंट्स ग्रुपतर्फे संजय गुगळे यांच्या हस्ते प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. यावेळी पल्स पोलिओ लसीकरणाचे महत्त्व, वेळापत्रक आणि ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना २ थेंब पाजण्याची गरज याबत सविस्तर माहिती दिली.

संजय गुगळे म्हणाले की, पोलिओमुक्त समाजासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. पल्स पोलिओ लसीकरण करणे आवश्यक असून पोलिओमुक्त अहिल्यानगर ही महानगरपालिकेची संकल्पना आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपल्या ५ वर्षांखालील मुलांना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमासाठी आरोग्य सेविका, शिक्षक व परिचारिका यांनी सहकार्य केले. ही रॅली यशस्वी होण्यासाठी सुवर्णा शेलार यांच्यासह परिचारिका व आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

# राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत

नगर – राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना आर्थिक आधार व सन्मान देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेअंतर्गत पात्र साहित्यिक व कलाकारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी १ ते ३१ जुलै दरम्यान अर्ज सादर करण्याचे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवड समितीचे सदस्य सचिव दादासाहेब गुंजाळ यांनी केले आहे.

राज्य शासनाने यापूर्वी सुरू असलेल्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेत सुधारणा करून नव्या स्वरूपात 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना' लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १५ वर्षांपेक्षा अधिक काळ कला क्षेत्रात सातत्याने कार्य करणारे आणि ज्यांची उपजीविका केवळ कलाक्षेत्रावर अवलंबून आहे असे ज्येष्ठ कलाकार तसेच १५ वर्षांपेक्षा अधिक काळ साहित्य क्षेत्रात लेखन, समीक्षा अथवा अन्य साहित्यिक योगदान देणारे साहित्यिक पात्र ठरणार आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली असून त्यांच्यासाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील योगदान किमान १५ वर्षांचे असावे तसेच त्यांचे कार्य सातत्यपूर्ण, दर्जेदार व समाजोपयोगी स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. वयोवृद्ध, विधवा, परित्यक्ता व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

कलाकार अथवा साहित्यिकाच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. अर्जदाराची उपजीविका प्रामुख्याने कलाक्षेत्रावर अवलंबून असावी. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेचा लाभ घेत असलेल्या व्यक्ती या योजनेसाठी पात्र राहणार नाहीत. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

इच्छुक कलाकार व साहित्यिकांनी https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज प्रक्रियेत अडचण आल्यास संबंधित तालुक्यातील गट विकास अधिकारी किंवा आपले सरकार सेवा केंद्राची मदत घेता येणार आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. ऑफलाइन अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.


पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण करण्यात आले.

# पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण

नगर – पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी उद्योजक गोरख भालके यांच्या वतीने शालेय बॅग, स्टेशनरी साहित्य वाटप तसेच वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन करून पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. त्यानंतर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय बॅग व पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विविध स्टेशनरी साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य दिनूकाका पंदरकर, पिंपळगाव पिसाचे सरपंच किशोर बापू पंदरकर, प्रकाश पाटील, देविदास आंधळे, डॉ. चंद्रकांत पंदरकर, समता विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष गणेश पंदरकर, दादा पंदरकर, उद्योजक अजय राऊत, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. राऊत, कदम सर, कळमकर सर, लगड सर, गायकवाड सर, पवार सर, कामडी सर, खामकर सर, प्रशांत शेलार, दिवटे मॅडम तसेच शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाच्या शिक्षकवृंदांनी केले.

# डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात योग दिन उत्साहात साजरा

नगर – डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमात डॉन बॉस्को प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच डॉन बॉस्को इंग्रजी माध्यम विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.


येथील डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षिका सोनाली गरुड यांनी प्रास्ताविक करत योगाचे महत्त्व विशद केले. योग म्हणजे शरीर आणि मन यांचा समन्वय असून भारताची ही प्राचीन परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महर्षी पतंजली यांनी प्रतिपादित केलेल्या अष्टांग योगाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. वैष्णवी वनारसे आणि ऋतुजा लाखे या विद्यार्थिनींनी योग दिनाचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करणारे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शारीरिक शिक्षण शिक्षक अमोल ठोंबे यांनी केले. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि त्यांचे आरोग्यदायी फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी स्वराज जेधे आणि सोहम सोरेकर यांच्या सहकार्याने योगासने व सूर्यनमस्कारांची प्रात्यक्षिके सादर केली. ऋषभ चव्हाण आणि सोहम भिंगारकर या दिव्यांग विद्यार्थ्यांनीही योग दिनात सहभाग घेतला.

विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. नियमित योगाभ्यासामुळे मन एकाग्र राहण्यास मदत होते आणि शैक्षणिक प्रगतीस चालना मिळते, असे त्यांनी सांगितले. इंटरनेट व मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असल्याचे नमूद करत, अभ्यासातील यशासाठी योग अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या उपक्रमासाठी संस्थेचे सचिव फादर रिचर्ड डिसिल्वा, व्यवस्थापक फादर थॉमस बेस्टीन, विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस, डॉन बॉस्को इंग्रजी माध्यम विद्यालयाचे मुख्याध्यापक रिचर्ड बुरखाव, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शिल्पा निकाळजे, समन्वयक फ्रान्सिस पाटोळे आणि डॉ. शितल कोतकर यांनी मार्गदर्शन केले.

# एसा असोसिएशनच्या वतीने सभासदांसाठी योग कार्यशाळा

## नियमित योगासन, संतुलित आहार आणि सकारात्मक जीवनशैलीमुळे निरोगी व दीर्घायुष्य लाभते : दिलीप कटारिया

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) अहिल्यानगर आणि अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष योग कार्यशाळेत योगाविषयी माहितीपूर्ण व्याख्यान, योग प्रात्यक्षिके आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा लाभ घेतला.


आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनच्यावतीने आयोजित कार्यशाळेत योग प्रात्यक्षिके करताना सभासद. (छाया : लहू दळवी)

यावेळी योग शिक्षक दिलीप कटारिया यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयांतर्गत योगासनांचे विविध प्रकार, त्यांचे आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. योगासनांच्या माध्यमातून शरीर आणि मन यांचा समतोल राखला जातो, मानसिक तणाव कमी होतो आणि व्यक्ती निरोगी जीवन जगू शकते, असे त्यांनी सांगितले.

कटारिया म्हणाले, नियमितपणे योगासने केल्यास विविध आजारांवर नियंत्रण मिळवता येते तसेच दीर्घायुष्य लाभते. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या आरोग्य समस्यांवर योग हे प्रभावी उत्तर असून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमात योग शिक्षिका विनया संजय विधाटे यांनीही उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी योगविद्याधाम येथे योगा इन्स्ट्रक्टर कोर्स पूर्ण करून योगप्रवेश, योग परिचय आणि योग प्रबोध या पदव्या संपादन केल्या आहेत. महिलांच्या वाढत्या व्यस्त जीवनशैलीचा विचार करून त्यांनी महिलांसाठी ऑनलाइन योग वर्ग सुरू केले असून आहारशास्त्राचे महत्त्व लक्षात घेऊन आहारतज्ज्ञ म्हणूनही प्रशिक्षण घेतले आहे. याशिवाय गर्भवती महिलांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या गर्भसंस्कार प्रशिक्षकाची पदवीही त्यांनी प्राप्त केली आहे. यावेळी त्यांनी उपस्थित सभासदांना सूर्यनमस्कार, ताडासन, कपालभाती, अनुलोम–विलोम, भ्रामरी प्राणायाम, वज्रासन आणि शवासन यांसारख्या विविध योगप्रकारांची माहिती देत त्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून घेतले. श्वसनाचे महत्त्व, योग्य आहार आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

विनया विधाटे म्हणाल्या, सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि फास्ट फूडच्या वाढत्या वापरामुळे अनेक आजार निर्माण होत आहेत. सकाळी उठल्यानंतर योग्य प्रमाणात पाणी पिणे, तसेच शरीराच्या प्रकृतीनुसार मध, जिरे, अजवाईन, ओवा यांसारख्या नैसर्गिक घटकांचे सेवन केल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. संतुलित आणि योग्य आहारामुळे निरोगी जीवन जगणे शक्य होते. प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांपेक्षा कच्च्या पालेभाज्या, फळे आणि नैसर्गिक अन्नघटकांचा आहारात समावेश केल्यास शरीराला आवश्यक पोषण मिळते. प्रत्येकाने दररोज किमान अर्धा ते पाऊण तास स्वतःसाठी राखून योगासने आणि प्राणायाम करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

संस्था सभासद श्वेता मुळे यांची कन्या राजवी हिने विविध अवघड योगासने सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत निर्माण झाली.

कार्यक्रमासाठी अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेडचे टेरिटरी टेक्निकल हेड प्रशांत जाधव, टेरिटरी सेल्स हेड निषाद जोशी, सीआरएम पराग जोशी, सोमनाथ पवार आणि प्रविण काकडे यांनी विशेष योगदान दिले.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, खजिनदार सुनील औटी, सुनील जाधव, आदिनाथ दहिफळे, तसेच सभासद जयप्रकाश विधाटे, नितीन कोरडे, सतीश कांबळे, कैलास ढोरे, बाबूजी ससाणे, नागेश खुरपे, मधुकर बालटे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रशांत जाधव यांनी केले. एसा असोसिएशनचे सचिव भूषण पांडव यांनी आभार मानले.

# सेंट विवेकानंद स्कूलमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांनी गिरवले योगसाधनेचे धडे

नगर – निरोगी तन आणि शांत मन याची गुरुकिल्ली म्हणजे योग ही उक्ती सार्थ करत, प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन व जागतिक संगीत दिनाचे औचित्य सांगून सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या विविध उपक्रमातून योग साधनेचे महत्त्व पटवून दिले. योगसाधनेचे फायदे आणि योग साधना करणे का जरुरीचे आहे या संदर्भात शाळेतील योगा शिक्षिका सौ. नयन तुपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


योग साधना करताना सेंट विवेकानंद प्राथमिक स्कूल मधील विद्यार्थी.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचे अतिशय उत्कृष्टरित्या सादरीकरण केले. तसेच विद्यार्थ्यांनी सूर्य नमस्कार याचे प्रात्यक्षिक सादर केले. इतकेच नव्हे तर जागतिक संगीत दिनानिमित्त छोट्या बालचमुनी 'ये तो सच है कि भगवान है!' हे सुंदर असे गीत आपल्या सुरेल आवाजात सादर केले. या गीताला मार्गदर्शन संगीत शिक्षक श्री. पठारे यांनी केले.

याप्रसंगी आप्पा नाना लाढाणे योगा मध्ये राज्य पंच, योगा व मल्लखांब प्रशिक्षक व उमेश झोटिंग सेक्रेटरी, अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्टस् असोसिएशन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य आहार आणि योग साधना याबद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. करिष्मा नवलानी व सौ.चांदणी सोनाग्रा यांनी केले.

याप्रसंगी प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना मौल्यवान संदेश दिला की योग आहे आरोग्यासाठी क्रांती, नियमित योगामुळे जीवनात येते सुख–शांती त्यामुळेच सर्वांनी दररोज योग साधना करण्याचा तसेच संगीताच्या माध्यमातून आपला छंद जोपासण्याचा मोलाचा संदेश दिला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राम मेघांनी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे व पूर्व प्राथमिक व प्राथमिक च्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिन व जागतिक संगीत दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# गुरुकुल कॅम्पसमध्ये योग दिन उत्साहात साजरा

नगर – तपोवन रोड येथील गुरुकुल कॅम्पस मध्ये डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त योगशिक्षक बबन हरी बारगळ व देविदास डहाळे यांनी विद्यार्थ्यांना योगासनाची शिकवण व मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाप्रसंगी बबन हरी बारगळ यांनी विद्यार्थ्यांना योगासनाची संपूर्ण माहिती सांगितली व विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली. त्याचप्रमाणे योगामुळे आपल्या शरीरासाठी असणारे फायदे, योगासने करून आपल्या जीवनाला व शरीराला आनंदी कसे ठेवू शकता याचे मार्गदर्शन केले.योगामुळे आपले शारीरिकच नाही तर आपली बुद्धी ही चाणाक्ष व तल्लक होते असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाप्रसंगी शाला समितीचे देविदास डहाळे, समीर पठाण, डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे, महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शुभम टेमकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिया शेख यांनी केले. या प्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी योगासनामध्ये उत्साहात सहभागी झाले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग व संगीत दिन साजरा

नगर – पोदार इंटरनॅशल स्कूलमध्ये २१ जून रोजी योगदिन व संगीत दिन साजरा करण्यात आला. योगाभ्यास हा भारताच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. याचेच महत्त्व लक्षात घेत शाळेतील विद्यार्थ्यांनी योग मार्गदर्शक नरेंद्र बोठे यांच्या मार्गदर्शनाखाली वज्रासन, गोमुखासन, बद्धकोनासन, सर्वांगासन असे विविध योगासने केली.




पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विविध योगासनाद्वारे योग दिन व संगीत दिन साजरा करण्यात आला.

तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्यातूनही योगाचे प्रकार दाखवून दिले. योग दिनाबरोबर शाळेत संगीत दिन ही साजरा करण्यात आला.

शाळेतील संगीत शिक्षक मनोज बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध संगीत वाद्य वाजवून संगीतातील विविध कला सादर केल्या.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले, की योगाने मन शांत राहते. मन स्थिर राहते, ज्यामुळे सकारात्मक विचारांचा प्रवाह निर्माण होतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो तसेच अभ्यासात चित्त एकाग्र होते त्यासाठी फक्त एक दिवस योगासने न करता रोजच योगासने करायला हवी असे आवाहन या वेळी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले. तसेच विद्यार्थ्यांनी संगीतातील दाखवलेले कौशल्य विविध वाद्य वाजवून संगीत दिन साजरा केला त्याबद्दल विद्यार्थ्यांचा कौतुक केले. अगदी पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा योगासने केल्याबद्दल याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना शाबासकी दिली, कौतुक केले.

सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थिनी स्वरांजली भालसिंग व साईशा बागुल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जैन भंडारी - भंडारी मुथा फाउंडेशनतर्फे २८ जूनला अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय पारिवारिक संमेलन

**भंडारी एवं भंडारी-मुथा पारिवारिक सम्मेलन 2026**
**एक समाज.. एक परिवार.. एक संकल्प..**
"संस्कारों से जुड़ें, संगठन को मजबूत करें, समृद्धी की ओर बढ़ें"

नगर – समाजाची एकता, संस्कृती, परंपरांचे जतन करणे आणि तरुण पिढीला प्रेरणादायी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने जैन भंडारी–भंडारी मुथा फाउंडेशनच्या वतीने नगरमध्ये 'भंडारी–भंडारी मुथा पारिवारिक संमेलन २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. २८ जून रोजी सकाळी ९ वाजता निल लॉन्स, केडगाव, अहिल्यानगर येथे हे संमेलनाचा शुभारंभ होईल. संमेलनाचे स्वागताध्यक्ष राजेश संतोष भंडारी (महावीर ग्रुप, टाकळी ढोकेश्वरवाला) यांनी नगरसह संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या समाजातील सर्व कुटुंबांना उपस्थित राहून हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

भंडारी–भंडारी मुथा समाजाच्या एकतेला नव्या उंचीवर नेण्यासाठी, समाजातील अनुभवी व प्रेरणादायी व्यक्तींकडून ज्ञान आणि मार्गदर्शन मिळवण्यासाठी, तरुणांना संस्कार, शिक्षण व नेतृत्वाची दिशा देण्यासाठी, आपल्या मुळांशी, परंपरांशी आणि सांस्कृतिक वारशाशी पुन्हा जोडले जाण्यासाठी, समाजातील कुटुंबांमध्ये दृढ संबंध व नवीन संधी निर्माण करण्यासाठी, स्नेह, सहकार्य आणि आपुलकीची भावना अधिक घट्ट करण्यासाठी, एक संघटित, प्रगतीशील आणि आत्मनिर्भर समाज उभारण्याचा संकल्प करण्यासाठी तसेच भंडारी–भंडारी मुथा समाजाच्या सुवर्ण भविष्यात सहभागी होण्यासाठी हे संमेलन महत्वाचे आहे.

संमेलनाची सुरुवात सकाळी ९ वाजता ब्रेकफास्ट (नाश्ता) आणि नोंदणीने होईल. कार्यक्रमास जितो अपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी, जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी, न्यायाधीश प्रितेश भंडारी, शासनाच्या जैन विकास महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी यांची प्रमुख उपस्थिती राहील.

यानंतर सकाळी १० ते १०.३० यावेळेत कुलदेवी माता आशापुराजी यांची आरती, वंदना आणि दीपप्रज्वलन सोहळा पार पडेल. यानंतर उद्घाटन सत्रात अतिथींचे स्वागत व सत्कार केला जाईल. सकाळी ११ ते १ यावेळेत बेंगळुरू येथील वक्ते, माईंड सेट कोच राहुल कपूर जैन यांचे चरणस्पर्श या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान होईल. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला नात्यांचे महत्त्व, ज्येष्ठांची सेवा आणि त्यांच्या आशीर्वादाने मिळवणारी ऊर्जा, भावा भावातील संवाद, पती पत्नी यांच्यातील आपुलकी, घरातील लहान मुलांना द्यावयाचे संस्कार, एकत्रित कुटुंब पद्धतीचे फायदे, नात्यांमधील वीण घट्ट कशी करावी याबाबत राहुल कपूर हे अतिशय सोप्या आणि प्रभावी शब्दात मार्गदर्शन करणार आहेत. कुटुंबातील तीन पिढ्या एकत्रितपणे या अभिनव प्रबोधनाचा लाभ घेऊन नवीन दृष्टीकोन प्राप्त करू शकतील.

संमेलनात दुपारी १ ते २ यावेळेत स्वप्निल चंगेडिया (इचलकरंजी) हे कुलदेवी माता आशापुराजी यांच्या पूजेचे महत्व आणि समाजाच्या गौरवशाली परंपरांबाबत उद्बोधन करतील. दुपारी २ ते ३ यावेळेत स्नेह भोजन, दुपारी ३ वाजता समाज परिचय व स्नेह मिलन आणि ३.३० वाजता हाय टी होईल.

या संमेलनासाठी संपूर्ण भोजन व्यवस्था महावीर ग्रुपचे राजेश संतोष भंडारी यांनी केली आहे. संमेलनांतर्गत आयोजित चरणस्पर्श कार्यक्रमासाठी सीए. आय.पी. अजय मुथा आणि आशिष अमृतलाल मुथा परिवाराकडून आर्थिक सहकार्य लाभले आहे.

कार्यक्रमात पुरुषांनी पांढरा कुर्ता–पायजमा आणि महिलांनी लाल साडी किंवा लाल सलवार सूट परिधान करून सहभागी व्हायचे आहे. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अ‍ॅड. प्रदीप मोतीलाल भंडारी, संतोष शांतीलाल भंडारी, सीए अभय मनसुखलाल भंडारी, मिठ्ठूलाल पोपटलाल भंडारी, अमित विजयकुमार मुथा, अजय रतनचंद मुथा, अशोक शांतीलाल भंडारी, गौतम प्रकाश मुथा, विक्की दिलीप मुथा, किरण प्रकाश भंडारी, राजेश कचरदास भंडारी, राहुल कांतीलाल भंडारी, सुरेश कांतीलाल भंडारी, सुभाष रमणलाल भंडारी, भूषण भागचंद भंडारी, सीए किरण पोपटलाल भंडारी, संतोष कनकमल भंडारी, विनोद बाबूलाल भंडारी यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. सर्व समाजबांधवांनी वेळेवर उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे असे आवाहन जैन भंडारी–भंडारी मुथा फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यद यांना राज्यस्तरीय खेलो मास्टर्स गेम्समध्ये तीन पदके प्राप्त


राज्यस्तरीय खेलो मास्टर्स गेम्स क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यद यांचा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सन्मान केला.

नगर – मुंबई येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय खेलो मास्टर्स गेम्स क्रीडा स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यद यांनी आपल्या अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत एका सुवर्णपदकासह दोन कांस्यपदकांना गवसणी घातली आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन ऑफ पालघर डिस्ट्रिक्ट यांच्या वतीने मुंबई येथील मरीन लाईन्स युनिव्हर्सिटी मैदानावर १३ आणि १४ जून दरम्यान या राज्यस्तरीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करताना अन्वरअली सय्यद यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये मोलाची कामगिरी बजावली. त्यांनी ११० मीटर अडथळा शर्यतीत (हर्डल्स) उत्कृष्ट वेग आणि अचूकतेचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यासोबतच, अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या १०० मीटर धावणे आणि ट्रिपल जंप या दोन्ही क्रीडा प्रकारांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन कांस्यपदके (ब्रॉन्झ मेडल) मिळवली.

अन्वरअली सय्यद यांनी यापूर्वीही अनेक राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये पदके पटकावून अहिल्यानगर पोलीस दलाचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांच्या खेळा मधील याच सातत्यपूर्ण कामगिरीची दखल घेत अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांनी सय्यद यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशामागे त्यांना राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, राखीव पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले यांच्यासह सर्व मार्गदर्शक व प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले.

# 'रयतच्या' समितीवर अ‍ॅड. रवींद्र शितोळे



नगर – रयत शिक्षण संस्थेच्या स्कूल कमिटीवर अ‍ॅड. रवींद्र प्रल्हादराव शितोळे यांची निवड करण्यात आली. रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली आहे.

अ‍ॅड. शितोळे हे अहमदनगर लॉयर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक आहेत. तसेच रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीचे सचिव व विश्वस्त असून शहराच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्यात अग्रेसर आहेत. शैक्षणिक क्षेत्रात कार्य करताना मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास जडणघडणीसाठी उपयुक्त बालसंस्कार वर्ग व असे अनेक उपक्रम त्यांनी राबवलेले आहेत. लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल चे माजी अध्यक्ष व झोन चेअरमन असताना कोरोनाच्या काळात अनेक रुग्णांना मोफत औषधोपचार केलेले आहेत. बालपणापासून राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून राष्ट्र सेवा दल सैनिक म्हणून शहर पातळीवर राज्य व देश पातळीवर विविध पदांवर यशस्वीरित्या कार्यरत राहून आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

पुणे येथील एस एम जोशी मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. विविध संस्थेचे कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहतानाच अनाथ आश्रम व विविध शैक्षणिक संस्थांना सढळ हाताने मदत व सहकार्य करीत आहेत.

अ‍ॅड. शितोळे यांच्या आज पर्यंतच्या कार्याची दखल घेऊन त्यांची रयतच्या शाळा समितीवर सदस्य म्हणून निवड ही अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा निश्चितच लाभ होईल.

# एशियन माउंटन बाईक सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताला कांस्यपदक

## अहिल्यानगर जिल्ह्याची प्रणिता सोमन आणि पुण्याची मनाली रत्नोजी यांचा भारतीय संघात कामगिरी


उझबेकिस्तान येथे २० ते २८ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या एशियन माउंटन बाईक सायकलिंग चॅम्पियनशिप मध्ये भारतीय संघाने उल्लेखनीय कामगिरी केली.

नगर – उझबेकिस्तान येथे २० ते २८ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या एशियन माउंटन बाईक सायकलिंग चॅम्पियनशिप मध्ये भारतीय संघाने उल्लेखनीय कामगिरी करत पहिल्याच दिवशी क्रॉस कंट्री मिक्स्ड रिले या प्रकारात कांस्यपदक पटकावले. या पदक विजेत्या भारतीय संघामध्ये महाराष्ट्रातील दोन महिला सायकलपटूंची निवड झाली होती. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याची प्रणिता सोमन आणि पुण्याची मनाली रत्नोजी यांचा समावेश होता. त्यांच्यासह आशिष शेरपा, के. हर्षिनी, संतोष प्राणेश आणि नोरबू यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले.

दिग्गज आणि बलाढ्य आशियाई प्रतिस्पर्ध्यांच्या उपस्थितीत भारतीय संघाने अत्यंत संयमी, तांत्रिक आणि दमदार कामगिरी करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले. भारतीय माउंटन बायकिंगच्या इतिहासातील हे यश अत्यंत महत्त्वाचे मानले जात असून, गेल्या सात दशकांहून अधिक काळ या क्रीडा प्रकारात भारताने केलेल्या वाटचालीला नवी दिशा मिळाल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने सलग दुसरे पदक जिंकत आशियाई स्तरावर पदकांसाठी भारत आता एक प्रबळ दावेदार म्हणून उदयास येत असल्याचे सिद्ध केले आहे. ही कामगिरी भारतीय सायकलिंगच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा आणि खेळाडूंच्या कठोर मेहनतीचा भक्कम पुरावा मानली जात आहे.

या यशाबद्दल सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष डॉ.विक्रम रोठे, उपाध्यक्ष अविनाश कदम, यशवंत नडगम, धनंजय वानखेडे, विजय जाधव, खजिनदार भिकन अंबे, अनिल तांबे, अभिजीत मोहिते, दीपाली पाटील, प्रवीण पाटील (सीईओ सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया) तसेच सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव प्रा.संजय साठे यांनी भारतीय संघाचे आणि विशेषतः महाराष्ट्रातील खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयाला महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून 'अ' दर्जा

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषी महाविद्यालयाला राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे मान्यताप्राप्त तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न असलेल्या या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम यामुळे महाविद्यालयाने कृषी शिक्षण क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मूल्यांकन समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक, संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासकीय व्यवस्था, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थी कल्याणविषयक उपक्रमांचे मूल्यमापन करून महाविद्यालयास 'अ' दर्जा प्रदान केला आहे. हा दर्जा महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीचा आणि उत्कृष्ट कार्याचा गौरव असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. बी.राऊत यांनी सांगितले.

या यशामागे संस्थेचे सचिव डॉ.पी.एम. गायकवाड, संचालक डॉ. अभिजित दिवटे, तंत्र संचालक सुनील कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील यांनी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# रस्त्याकडेला कचऱ्याचे ढीग; विद्यार्थी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात कचरा न उचलल्यास आयुक्तांच्या दालनात तीव्र आंदोलनाचा इशारा



कल्याण रोड परिसरात डीपी रस्त्यांच्या कडेला साचलेले कचऱ्याचे ढिग. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – शहरातील कचरा उचलण्यासाठी महापालिकेच्या ७० ते ८० घंटागाड्या आहेत. मात्र, तरीही रस्त्यांच्या कडेला पडलेला कचरा उचलला जात नाही. त्यामुळे परिसरातील विद्यार्थी, नागरिक यांचे आरोग्य धोक्यात आले असून, नियमित कचरा संकलन केले जात नसल्यामुळे रस्त्याकडेलाच कचऱ्याचे ढिग साचत आहेत. या कचऱ्यातून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असून, त्याचे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

शहरातील कल्याण रोड परिसर हा झपाट्याने विकसित होत असलेला निवासी भाग आहे. या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. मात्र, या भागात महापालिकेच्या कचरा संकलन करणाऱ्या गाड्या वेळेवर येत नाहीत. त्यामुळे नागरिक रस्त्याकडेला कचरा टाकत असून, यामुळे परिसरातील शाळेतील विद्यार्थी, नागरिक यांच्या आरोग्याचा प्रश्न बिकट बनला आहे. उद्धव अकॅडमी शाळे समोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत असून पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. युवराज शिंदे यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत महानगरपालिका प्रशासनावर टीका केली आहे. ते म्हणाले की, कल्याण रोड परिसरात नव्याने तयार करण्यात आलेल्या डीपी रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे पूर्ण झाली असली तरी स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. विश्व मॉलच्या पाठीमागील भागात मोठा कचऱ्याचा ढीग निर्माण झाला असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.कल्याण रोड परिसरात नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यामुळे घंटागाडीचे नियोजन वेळेवर होणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा घंटागाडी नियोजित वेळेत येत नसल्याने नागरिकांना पर्याय नसल्या मुळे रस्त्याच्या कडेला कचरा टाकावा लागतो. परिणामी ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवरही महापालिकेने दंडात्मक कारवाई करावी. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. मात्र, त्यासाठी महापालिकेने देखील आपली जबाबदारी पार पाडत घंटागाडीचे योग्य नियोजन करावे आणि वेळेवर प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत सेवा पोहोचवावी. महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पुढील आठ दिवसांत कल्याण रोड परिसरातील कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा आयुक्तांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही अ‍ॅड. युवराज शिंदे यांनी दिला आहे.

# सीए फायनल परीक्षेत आदित्य खरदासचे यश



नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया तर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत अहिल्यानगरच्या आदित्य खरदास याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत चार्टर्ड अकाउंटंट (सीए) होण्याचा मान मिळविला आहे. आदित्यने यापूर्वी सीए फाउंडेशन तसेच सीए इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षाही पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करून आपल्या सातत्यपूर्ण मेहनतीची आणि गुणवत्तेची छाप पाडली होती.

आदित्यचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बाई ईचरजबाई व भाऊसाहेब फिरोदिया विद्यालय, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावीचे वाणिज्य शाखेचे शिक्षण त्याने न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे पूर्ण केले.

आदित्य हा कै. किसन चंद्रय्या खरदास, सहकार खात्यातील सेवानिवृत्त ऑडिटर यांचा नातू आहे. तसेच पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर येथील वरिष्ठ लिपिक संजय किसन खरदास आणि श्री मार्कंडेय विद्यालय, अहिल्यानगर येथील शिक्षिका रेणुका संजय खरदास (दासरी) यांचा पुत्र आहे.

# भाजपाच्या ४ नवनिर्वाचित आमदारांचा नगरमध्ये २६ जून रोजी सत्कार सोहळा

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे आणि सभापती प्रा.राम शिंदे यांची उपस्थिती

नगर – नुकत्याच झालेल्या विविध निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या भाजपाच्या ४ नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार समारंभ २६ जून रोजी जिल्हा व शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा बँक मधील सहकार सभागृह येथे दुपारी ३ वाजता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे आणि विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांची उपस्थिती होणार असल्याची माहीती भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व दक्षिण दिलीप भालसिंग यांनी दिली.

या सत्कार सोहळ्यात नुकत्याच झालेल्या विधान परीषदेच्या निवडणुकीत अहिल्यानगरचे भूमीपुत्र आणि गेली अनेक वर्षे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणारे सुनिल कर्जतकर यांची विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवड झाली. तसेच आ.विवेक कोल्हे व आ.प्राजक्त तनपुरे यांचीही विधनापरिषद निवडणुकीत बिनविरोध निवड झाली आहे. तक्षेच राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत विजयी झालेले आ.अक्षय कर्डिले या नवनिर्वाचित आमदारांच्या नागरी सत्काराचे आयोजित करण्यात आले आहे.

या सत्कार सोहळ्यास आ.संग्राम जगताप, आ.मोनिका राजळे, आ.काशिनाथ दाते, अमोल खताळ, आशुतोष काळे, विठ्ठल लंघे, विक्रमसिंह पाचपुते, यांच्यासह महायुतीचे सर्व नगराध्यक्ष आणि नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# अहिल्यानगरमध्ये ११ जुलैला आंतरशालेय योगासन स्पर्धा

नगर – २१ जून हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संस्कृती व शास्त्रपरंपरेतील योगाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी, तसेच शालेय जीवनातच निरोगी व संतुलित जीवनशैलीची पायाभरणी व्हावी या उद्देशाने कै. विजया (ताई) शिवलकर आंतरशालेय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष असून, ११ जुलै रोजी ही स्पर्धा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शालेय जीवनात विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण होत असते. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून केला जात आहे.

स्पर्धा इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते नववी अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी 'योग विद्या धाम', अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

स्पर्धेचे ठिकाण 'पालवी शिशुविहार', शुभमंगल कार्यालय, भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर असे असून, शहर व परिसरातील शाळांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी ९८९०००१८४० अथवा ९०११५६८५६७ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

## आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

आनंदऋषी योगा सेंटर, आनंदऋषी ब्लड बँक खाली आहे. तिथे दररोज श्री. मेहेर सर योगाचे क्लास जवळ जवळ ३५ वर्षापासून घेतात. मी या योगा क्लासला १८ जुलै २०२५ पासून येते. मला गुडघ्याचा, मानेचा, पाठीचा त्रास आहे. योगा सुरु केल्यापासून या दहा महिन्यांमध्ये मला जवळ जवळ ५०% फरक झाला. मी आता मांडी घालून खाली बसू शकते. मानेचा, पाठीचाही त्रास कमी झाला आहे. श्री. मेहेर सर योगा घेताना प्रत्येक व्यायामाची माहिती सांगून व्यायाम घेतात. त्यामुळे योगाची चांगलीच आवड निर्माण झाली आहे. दररोज योगा केल्याने दिवसभर आपण उत्साही, आनंदी राहतो. थकवा येत नाही, कामाचा कंटाळा येत नाही. तसेच योगाबरोबर झुंबा घेतला जातो. हास्य योगा घेतला जातो. त्यामुळे सर्व शरीर अ‍ॅक्टीव्ह होते. उत्साह वाढतो. आपले वजन प्रमाणात राहते. खूप समाधान वाटते आणि योगामुळे माझा दवाखाना, औषधे बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे आपला दररोजचा १ तास योगासाठी देणे मला महत्वाचे वाटते. आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी आपण आपल्यासाठी वेळ देणे महत्वाचे आहे.



'हेल्थ इज वेल्थ' निरोगी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आरोग्य चांगले असेल तर आपण आयुष्यात चांगले जगू शकतो आणि दुसऱ्यालाही आपल्यापासून त्रास होत नाही.

**– शकुंतला खैरे,** बुरुडगाव रोड, अ.नगर

